# लेनी आणि टुकटुक
# मित्र पाहिजे!

Pathfinder
C11982

क्लाऊस् बाउमगार्ट



वाचन पातळी २

# लेनी आणि टुकटुक
# मित्र पाहिजे!


लेखन आणि चित्रं
क्लाऊस् बाउमगार्ट






मूळ जर्मन भाषेतील कथेचा मराठी अनुवाद
जयश्री जोशी





खरं सांगायचं म्हणजे हे कालपासूनच सुरु झालं होतं.
पण आज तर अजूनच कठीण होऊन बसलंय.
लेनीला काहीतरी हवं आहे, कशाची तरी उणीव भासतीय त्याला.

''मला वाटतंय, मला किनई एखादा मित्र मिळायला हवा. त्याच्याबरोबर वाट्टेल तशी मस्ती वगैरे करता येईल आणि अजूनही बरंच काही...'' लेनीच्या डोक्यात चक्र फिरताहेत.









आणि यावर ढीगभर विचार करून झाल्यावर
लेनी घरात जातो. जवळच्या गाडीतच त्याने घरकुल थाटले आहे.
तर घरात जाऊन तो एका कागदावर लिहितो : मित्र पाहिजे.
आहेस का तू तसा? मग लगेच लेनीला कळव बघू.






त्यानंतर लेनी घरातून निघतो आणि चालत सुटतो –
तो कागद टांगायला साजेशी जागा शोधायला हवी ना?
एका जागी त्याला दिसतं एक हे भलंऽऽ थोरलं झाड.
''हां, ही एकदम सही जागा आहे.'' लेनी ठरवून टाकतो.
''पण ही जाहिरात फार उंचावर नको लावायला,
माझा मित्र कदाचित अगदीच बुटकबैंगण असला तर पंचाईत.
पण फार खाली पण नको बुवा लावायला, नाही म्हणजे
तो मित्र नेमका उंचाड्या निघायचा आणि मग
ती जाहिरात त्याच्या मुळी नजरेलाच पडायची नाही,
जास्त खाली लावली तर.''





मग काय, लेनी तो जाहिरातीचा
कागद वर आणि खाली यांच्या
अगदी मधोमधच चिकटवून टाकलो.



भन्नाट खूष होऊन लेनी घरी परत येतो
आणि वाट बघू लागतो.

आणि वाट बघत राहतो...






आणि वाट बघतच राहतो...



पण पुढं काहीच घडत नाही. लेनीच्या मनात येतं,
''कदाचित तो कागद खाली पडून गेला असेल, आणि त्यामुळं माझ्या
मित्राच्या दृष्टीलाच पडला नसेल.'' कारण अगदी मित्र म्हटला
तरी त्याला असा खाली पडून गेलेला निरोप मिळणं अवघडच, नाही का?
जरा जाऊन बघितलेलंच बरं, तो कागद अजून त्या झाडावर लटकतोय का नाही ते.


कागद तर अजून तिथेच लटकतोय.
लेनी मागे वळतो आणि त्याची कुणाशी तरी
टक्कर होता होता जेमतेम वाचते.








''माफ करा हं'' एक किनरा आवाज येतो.
''बरं बरं, ठीक आहे'' लेनी गुरगुरतो.
''माझं नाव टुकटुक. आणि तुझं?'' पुन्हा तोच किनरा आवाज.
''मला इथं गप्पाबिप्पा मारत बसायला वेळ नाहीये'' लेनी सरळ सांगून टाकतो.
''मला लवकर घरी जाऊन बघायला हवं, माझ्यासाठी एखादा मित्र आलाही असेल एव्हाना.''
''मी पण बघू का रे तुझ्याबरोबर येऊन?'' टुकटुक विचारतो.
''चल तुला हवं तर, मला काय? पण मला त्रास देऊ नको उगाच.'' लेनी उत्तरतो.





आता ते दोघं लेनीच्या घरकुलासमोर बसून वाट पाहू लागतात.
''कसा दिसतो रे तुझा मित्र?'' काही वेळाने टुकटुक विचारतो.
''माहित नाही बुवा.'' लेनी म्हणतो.
''मित्राला ओळखायची काही खूण वगैरे असते का रे?''
टुकटुक परत थोड्या वेळाने विचारतो. ''अं-मित्र-मित्र म्हणजे असं कोणीतरी, ज्याच्याबरोबर कध्धीच कंटाळा येत नाही, कधीकधी भांडणसुद्धा होतं म्हणा त्याच्याबरोबर, पण मग पुन्हा बट्टी आणि दोस्ती पण! आणि दोस्त आपल्याबरोबर नसला की त्याची खूपच आठवण येत राहते.'' ''पण तुझा दोस्त येणार तरी कधी?'' पुन्हा असाच थोडा वेळ गेल्यावर टुकटुक विचारतो.
''माहीत नाही रे.'' लेनी जरा अस्वस्थपणे उत्तरतो.
''मग तुझ्या मित्राची वाट बघत बघत आपण काहीतरी खेळूया का?'' टुकटुक सुचवतो. लेनीलापण ही कल्पना आवडते. मित्राची वाट किती वेळ बघत बसावं लागेल हे सांगता येतं का?





ते दोघं मग लपाछपी खेळतात...




...खड्डे खणून खजिन्याचा शोध घेतात...




...लेनीच्या खेळातल्या विमानातून उडून येतात...






...तलावात डुबक्या मारतात. ...

...ढगांकडे टक लावून बघत बसतात...






....आणि चॉकलेट पुडिंग सुद्धा बनवतात. ''चॉकलेट पुडिंगमधे पुरेशी गाजरं घातली ना की चॉकलेट पुडिंग आरोग्याला फार चांगलं असतं.'' लेनी म्हणतो.
''हो का रे?'' टुकटुकला आश्चर्यच वाटतं, त्याला हे माहीतच नव्हतं ना आजपर्यंत.
शेवटी ते दोघं सूर्यास्त पहायला लागतात आणि मग हळूहळू अंधार पडू लागतो तेव्हा टुकटुक म्हणतो, ''आता निघतो बरं का मी. अरे पण तुझ्याकडे कोणीच मित्र नाही आला म्हणून जरा वाईट वाटतंय रे मला.''
हं... लेनी हुंकारतो.







टुकटुक निघून जातो, नजरेआड होतो, तसं लेनीला अस्वस्थ वाटायला लागतं. ए, अरे थांब ना जरा... तो हाक मारायला लागतो. पण टुकटुक तर एव्हाना त्याच्या हाकेच्या पल्ल्याच्या बाहेर पार लांब निघून गेलाय.



पण खरं तर आपले मित्र आपल्याला भेटायला वरचेवर येतच राहतात...




...आपल्या जवळ थांबतात...
होय की नाही, सांगा बरं?



जेव्हा तुम्हाला एकटं, कंटाळवाणं वाटत असतं
तेव्हा तुम्हाला परत आनंदी कोण करतं?
अर्थात तुमचा चांगला मित्र! पण असा मित्र कोण
हे कसं ओळखायचं?
बऱ्याचवेळा हे पटकन लक्षातच येत नाही.
वाचा, अशाच दोन मित्रांची ही गोड गोष्ट.

**टप्याटप्याने वाचायला शिकणे. या पुस्तकाची वाचन पातळी २ आहे.**




PRATHAM BOOKS

प्रथम बुक्स ही ना-नफा संस्था असून मुलांमध्ये वाचनाची आवड रुजावी यासाठी अनेक भारतीय भाषांमध्ये पुस्तकं प्रकाशित करते.

www.prathambooks.org

Lenny and Tweek Wanted: A Friend
(Marathi)
MRP: Rs. 35.00

ISBN 978-93-5022-041-2